GVT कृषीकुल

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535



# आंबा

**पिकाचे नाव:** आंबा
**शास्त्रीय नाव:** मैंजीफेरा इंडिका
**कुळ:** अनाकार्डियासी
**वाण:** भारतात अनेक आंबा जातींची लागवड केली जाते, परंतु केशर, अल्फोन्सो, तोतापुरी, दशहरी, निलम, लंगडा या काही प्रमुख जाती व्यावसायिक दृष्टीकोनातून उत्पादनासाठी चांगल्या आहेत.
**लागवड अंतर:** 20x20, 18x18, 15x15, 12x12, 8x12, 6x12, 8x14, 6x14

**आंब्याचे गुणधर्म:** आंबा हे जगातील सर्वात स्वादिष्ट फळ आहे. आंब्याला फळाचा राजा देखील समजले जाते. आंबा हे भारताचे राष्ट्रीय फळ असून भारत देशासाठी अभिमानास्पद आहे. त्याची गोड चव, आनंददायी सुगंध, आकर्षक रंग, सर्वांना आवडतो. आंबा हे जगातील उष्णकटिबंधीय आणि उपोष्णकटिबंधीय प्रदेशातील सर्वात महत्वाचे फळ आहे. भारत हा आंबा पिकाचा सर्वात मोठा उत्पादक आहे आणि भारतात उत्तर प्रदेश हे राज्य उत्पादनात पहिल्या क्रमांकावर आहे. पिकलेल्या फळांच्या गरामध्ये सुमारे 11.8 टक्के कार्बोहायड्रेट, 4800 IU व्हिटॅमिन ए आणि 13 mg/100g एवढे एस्कॉर्बिक ॲसिड असते. तसेच आंबा हे बीटा कॅरोटीन, ग्लुकोज, फ्रूक्टोज आणि सुक्रोजचा समृद्ध असा स्त्रोत आहे.
**माती:** आंबा हे पिक वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनीवर पिकवता येते, परंतु हलकी ते मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी 5.5- 7.5 सामू असलेली जमीन लागवडीसाठी निवडावी. खोल काळी, भारी, टणक खडक, चुनखडी युक्त असलेली जमीन लागवडी साठी टाळावी.
**हवामान:** सामान्यत: आंब्याची लागवड आपण संपूर्ण भारतभर करू शकतो परंतु फुल व फळधारणेसाठी कोरडे हवामान असणे आवश्यक आहे. आंबा पिकाला रोपांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी कमीतकमी तापमान 24-27° डिग्री सेल्सिअस तसेच फुल धारणेसाठी 15° डिग्री सेल्सिअस आणि फळ धारणेसाठी 20° डिग्री सेल्सिअस एवढे आवश्यक असते, वार्षिक पाऊस साधारण 125 सेमी असायला हवा.
**उत्पादन:** अतिघण लागवड पद्धतीत, व्यावसायिक उत्पादन दृष्ट्या लागवडीच्या चौथ्या वर्षानंतर उत्पादन सुरु होते, अंदाजे 12-15 किलो फळ/झाड एवढे उत्पादन मिळते.
**कीटक:** तुडतुडे, फुलकिडे, पिठ्या ढेकूण, खोडकिड, मिज माशी, फळमाशी, लालकोळी
**रोग:** भुरी, अँथ्रॅकनोज (करपा), डिंक्या
**शारीरिक विकार:** मालफोर्मेषण (Malformation पानांची, कोंबांची आणि फुलांची असाधारण वाढ)

# आंबा
## केसर

अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** केसर
**लागवड दिनांक:** 29-30/10/2023
**लागवड अंतर:** 6 x 12 फूट
**लागवड क्षेत्र:** 17 R
**रोपांची संख्या:** 272

**केशरचे वैशिष्ट्य:** अनियमित फळधारणा होणारी परंतु जास्त उत्पादन देणारी जात. फळांचा आकार मध्यम (270 ग्रॅम), गोड आणि तंतुमय गर. फळांची चांगली टिकवण क्षमता त्यामुळे लांब वाहतुकीसाठी आणि प्रक्रिया उद्योगा साठी चांगली जात.
**उत्पादन:** अतिघण लागवड पद्धतीत, व्यावसायिक उत्पादन दृष्ट्या लागवडीच्या चौथ्या वर्षानंतर सुरु होते आणि अंदाजे 12-15 किलो फळ/झाड.

